# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.01.2025** **वारःगुरुवार**

---

1. भारतीय नौदल आणि लष्कराचं काल महाराष्ट्रात समर्थ दर्शन
2. निलगिरी युद्धनौका, सूरत विनाशिका आणि वाघशीर पाणबुडीचं पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रार्पण
3. संरक्षण सामग्रीमध्ये देशाची स्वयंपूर्णतेकडं वाटचाल-संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन, सत्त्यातराव्या लष्कर दिनाचं पुण्यात दिमाखदार संचलन; आणि
4. महिला क्रिकेटमध्ये भारताचा आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय

**<u>पंतप्रधान</u>**

निलगिरी युद्धनौका, सूरत विनाशिका आणि वाघशीर पाणबुडीचं राष्ट्रार्पण ही नौदलाच्या गौरवशाली परंपरेला भविष्यातील आकांक्षेशी जोडणारी ऐतिहासिक घटना आहे. यामुळे भारताची वाटचाल मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेनं सुरू असून भारताच्या सुरक्षा आणि प्रगतीला मोठं सामर्थ्य प्राप्त झाल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत.

सूरत आणि निलगिरी या युद्धनौका तसंच वाघशीर ही पाणबुडी; या तीन महत्वाच्या नौकांची बांधणी मुंबईतील नौदलाच्या माझगाव गोदीमध्ये करण्यात आली आहे. नेव्हल डॉकयार्ड इथे काल झालेल्या कार्यक्रमात मोदी यांच्या हस्ते राष्ट्राला समर्पित करण्यात आल्या. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नौसेना प्रमुख दिनेशकुमार त्रिपाठी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

संपूर्ण विश्व हा परिवार समजून भारत विकासाच्या भावनेनं काम करतोय. तीन आघाडीच्या लढाऊ जहाजांचा नौदलामध्ये समावेश म्हणजे भारताची एक भक्कम आणि स्वावलंबी संरक्षण दल निर्माण करण्याची दृढ वचनबद्धताच आहे. विकसनशील देशांमध्ये भारत एक विश्वासार्ह आणि जबाबदार देश म्हणून ओळखला जातो. तीन युद्धनौकांचं राष्ट्रार्पण हे आर्थिक दृष्टीनेही महत्त्वाचं असल्याचं ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र भूमीवर भारतीय नौदलानं स्वावलंबी होण्याच्या दिशेनं हे महत्त्वपूर्ण पाऊल उचललं असल्याचं मोदी यांनी यावेळी नमूद केलं. हा दिवस नौदलासाठी गौरव आणि प्रतिष्ठेचा दिवस आहे. या निमित्ताने शक्ती, क्षमता आणि आत्मनिर्भरता साजरी होत असल्याचं नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेशकुमार त्रिपाठी यांनी सांगितलं. दरम्यान नवी मुंबईतील इस्कॉनच्या श्रीश्री राधा मदनमोहनजी मंदिराचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते काल करण्यात आलं.

**राजनाथ सिंह**

भारत संरक्षण क्षेत्रातील शस्त्र सामग्री आणि उपक्रमांसाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून राहू शकत नाही. देश संरक्षण सामग्रीबाबत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत आहे. 2025 हे वर्ष भारतीय सेनेचं तंत्रज्ञान सुधारणा वर्ष म्हणून जाहीर करण्यात आलं असून, या वर्षभरात तंत्रज्ञानविषयक सुधारणा केल्या जातील असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल पुण्यात केलं. 77 व्या लष्कर दिनानिमित्त आयोजित गौरव गाथा या कार्यक्रमात सिंह बोलत होते. यावेळी सिंह यांच्या हस्ते ऑलिम्पिक उत्कृष्टता केंद्राचा शिलान्यास आणि भारतीय रणभूमी दर्शन या संकेत स्थळाचं अनावरण करण्यात आलं. बॉम्बे सॅपर्स मध्ये सुरू करण्यात आलेल्या ऑलिम्पिक उत्कृष्टता केंद्रात सेनेतील दिव्यांग जवानांना क्रीडा प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

भारतानं नेहमीच युध्दाऐवजी बुध्दांना प्राधान्य दिलं आहे. मात्र, शांतता ही भारताची दुर्बलता नव्हे. जेव्हा आपण बळकट असू तेव्हाच शांतता शक्य असल्याचं संरक्षणमंत्र्यांनी सांगितलं...

**संचलन**

77 व्या लष्कर दिनाचं मुख्य संचलन काल पुण्यात बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या उपस्थितीत झालं. देशाची उत्तर सीमेवरील परिस्थिती स्थिर परंतु संवेदनशील आहे. गलवान सीमेवरील घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी भारतीय सेना सतर्क आहे असं जनरल द्विवेदी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं. जम्मू काश्मीरच्या अंतर्गत भागात लष्कराच्या प्रयत्नांमुळे हिंसाचार कमी झाला असल्याचं सांगून या वर्षात लष्करातील तंत्रज्ञान अधिक अद्ययावत आणि आधुनिक करण्यावर भर दिला जाईल असं ते म्हणाले. या सोहोळ्याचा हा वृत्तांत....

**जनरल उपेंद्र द्विवेदी यांचं कार्यक्रम स्थळी आगमन झालं आणि हवाई दलाच्या सुखोई विमानांनी मानवंदना दिली. मेजर जनरल अनुराग वीज यांनी संचलानाच नेतृत्व केलं. चेतक चीता आणि ध्रुव या हेलिकॉप्टर्स नी कदम ताल करणाऱ्या पथकांवर पुष्प वृष्टी केली. भारतीय तोफखाना दलाचं पथक सगळ्यात पाहिलं होतं. लष्कर पोलीस दलाच महिला अग्नीवीर पथक आणि राष्ट्रीय छात्र सेना अर्थात NCC च महिला पथकानं संचलानाच्या माध्यमातून महिला शक्तीचा नारा दिला. भारतीय लष्करात वापरली जाणारी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आणि उपकरणांनी संचलानाची शोभा वाढवली. उपकरणांच मुख्य आकर्षण होतं रोबोटिक म्युल संजय, सर्वम, त्रिनेत्र आणि मालवाहतूक करणाऱ्या ड्रोनच यामध्ये सहभाग होता. भीष्म आणि वज्र रणगाडा, सारथ चिलखती वाहन, ऐरावत, रणविजय, रणजित ही आधुनिक वाहन, देशी बनावटीचे पिनाका रॉकेट लौंचार, ड्रोन जॅमर यंत्रणा, सर्वत्र यंत्रणा आणि भारतीय लष्कराच्या घोड दलाचं पथक यांनी संचलनाची शान वाढवली. तर पहिल्यांदाच सहभागी झालेले नेपाळ लष्करी वाद्यवृंद हे या कार्यक्रमाचं मुख्य आकर्षण होतं. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, श्रद्धा वार्डे, पुणे.**

**अटल**

महाराष्ट्र राज्य सीईटी परीक्षेसाठीच्या 'अटल' या ऑनलाइन नोंदणी प्रणालीचं उद्घाटन उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते काल झालं. राज्य सामायिक प्रवेश कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या विविध व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षांचा सराव करता यावा म्हणून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल, असं पाटील यांनी म्हटलं आहे.

**<u>वाल्मीक</u>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी, संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्याखाली, अटकेत असलेल्या वाल्मिक कराड याला काल बीडच्या विशेष न्यायालयानं 22 जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

**<u>क्षयरुग्ण-रत्नागिरी</u>**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातल्या सक्रिय क्षयरुग्ण शोधमोहिमेत 34 क्षयरुग्ण आढळले अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉक्टर महेंद्र गावडे यांनी दिली आहे. या रुग्णांवर उपचार केले जात आहेत.

**<u>निधन</u>**

ज्येष्ठ सर्वोदयी कार्यकर्ते रघुनाथ तळवलकर यांचं मुंबईत वृध्दापकाळाने नुकतंच निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. मुंबईत भूदान यज्ञ समिती आणि मुंबई सर्वोदय मंडळाच्या स्थापनेतील ते एक आद्य कार्यकर्ते होते. आपल्या पत्नीसोबत त्यांनी घरोघरी जाऊन सर्वोदय-पात्र पोहोचवलं आणि साहित्य प्रचार केला.

**<u>कबड्डी</u>**

तेविसाव्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचं उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल बारामती इथं करण्यात आलं. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावानं आयोजित होणाऱ्या कबड्डी, खोखो, कुस्ती आणि व्हॉलीबॉल या चार राज्यस्तरीय स्पर्धांसाठी दिले जाणारे 75 लाख रुपयांचं अनुदान वाढवून एक कोटी रुपये करण्याची घोषणा पवार यांनी यावेळी केली. स्पर्धेत 16 महिला आणि 16 पुरुष संघ आणि 600 पेक्षा अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये, भारताने आयर्लंडविरुद्धची मालिका 3-0 अशी जिंकून आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय मिळवला आहे. गुजरातमधील राजकोट इथे झालेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात सुरुवातीला भारतानं 50 षटकात 5 गडी गमावत ऐतिहासिक 435 धावा केल्या. एकदिवसीय सामन्यातील त्यांची सर्वोच्च धावसंख्या असून महिला क्रिकेटच्या इतिहासातील ही चौथी सर्वोच्च धावसंख्या आहे. आयर्लंडने कालच्या सामन्यात, 31.4 षटकांत सर्वबाद 131 धावा केल्या. प्रतिका रावळ या सामन्यातली, तसंच संपूर्ण मालिकेतली, सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<u>हवामान</u>**

राज्यात ढगाळ हवामानामुळं किमान तापमानात वाढ झाली आहे. सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,
## नमस्कार.